# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २३, १९४५ (शके)**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री**
**(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

## विनाअनुदानित व अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांना प्रचलित पध्दतीने अनुदान देण्याबाबत

**(१) * २१०७१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ ते २० वर्षांपासून विनाअनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अनेक वर्षे काम करून शाळा/वर्ग/तुकड्यांना प्रचलित धोरणानुसार अनुदान दिलेले नाही तसेच काही शाळांना अंशत: अनुदान मिळालेले असून, वाढीव टप्पा अनुदान अद्यापि सलग मिळाले नसल्याचे तसेच अकोला जिल्ह्यामधील शाळांच्या विविध प्रकारच्या टप्पा वाढ अनुदान मंजूर आदेश अद्यापपर्यंत मिळालेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे; हे खरे आहे,

(२) असल्यास, अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयावर काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ व ४ जून, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक टप्पा वाढ अनुदान वितरण सुत्र लागू करुन १०० टक्के अनुदान मिळणे व अन्य मागण्यास्तव शिक्षक समन्वय संघाच्यावतीने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ पासून बेमुदत धरणे/आमरण उपोषण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अनुदान वितरणाच्या शासन निर्णयानुसार नवीन २० टक्के अनुदानास पात्र बहुतांश शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे विद्यार्थी संख्या अभावी, टीईटी उत्तीर्ण नसल्यामुळे इत्यादी कारणांनी अनुदानापासून वंचित असून, यातील काही कर्मचारी गत १० ते १५ वर्षांपासून विनावेतन काम करत आहेत व आज ते २०% अनुदानास अपात्र ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील २०% अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २०% अनुदान, ४०% अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २०% अनुदान व नव्याने अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना २०% अनुदान देण्याच्या शासन निर्णयानुसार माहे सप्टेंबर, २०२३ अखेर अनुदानास पात्र होऊनही शासनाच्या काही जाचक अटींमुळे वेतन अनुदानापासून वंचित राहिलेल्या तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना जिल्हानिहाय अनुदान वितरीत होऊन वेतन सुरु झालेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने त्रुटी पूर्ण केलेल्या व मुल्यांकनास पात्र ठरलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानासाठी घोषित करणे, अंशत: अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना यापुढे प्रचलित धोरणानुसार १००% अनुदान देणे, गत वर्षी रुपये ११६० कोटी अनुदान दिलेल्या शाळांना टप्पा वाढ करणे किंवा प्रचलित नियमानुसार अनुदान देणेबाबत तसेच विनाअनुदानित व अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांना प्रचलित पध्दतीने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता प्राप्त झालेल्या राज्यातील शाळांना विहीत पात्रता निकषांच्या पुर्ततेच्या अधिनतेने टप्याटप्याने शासन अनुदान मंजूर करण्याबाबत धोरण दिनांक १५/११/२०११, दिनांक १६/०७/२०१३, दिनांक ०४/०६/२०१४ व दिनांक १४/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घोषीत करण्यात आले आहे. त्यानुसार, विहीत पात्रता निकषांची पुर्तता करणाऱ्या शाळांना वेळोवेळी अनुदान मंजूर करण्यात येते.

शासन निर्णय, दिनांक ६/२/२०२३ नुसार पात्र शाळांना अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत माहे डिसेंबर २०२३ अखेर पावेतो पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

त्याअनुषंगाने मा.मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/१०/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली आहे.

(३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन काम करीत आहेत, अशी वस्तुस्थिती नाही. राज्य शासनाने वेळोवेळी मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केलेल्या पात्रतेच्या निकषांनुसार पात्र शाळांना वेळोवेळी अनुदान देण्यात आले आहे.

(४) अनुदान पात्रतेचे निकष योग्य व न्यायोचित असल्याचे विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये स्पष्ट झाले आहे. तथापि, शासन निर्णय, दिनांक ६/२/२०२३ मधील तरतूदीचा लाभ जास्तीत जास्त शाळांना व

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रक, दिनांक २४/४/२०२३, शासन पत्र दिनांक २६/९/२०२३ व शासन पुरकपत्र दिनांक २६/९/२०२३ अन्वये निकषांमध्ये मोठ्या प्रमाणावर सूट देण्यात आली आहे. जिल्हानिहाय एकत्रित माहिती सोबत जोडण्यात आली आहे

(५) शासन पत्र, दिनांक ९/११/२०२३ अन्वये, पुढील प्रत्येक वर्षी माहे सप्टेंबर पर्यंत आधार प्रमाणित संचमान्यता पूर्ण करुन, अनुदानासाठी पात्र ठरत असलेल्या शाळा/ तुकड्यांवरील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना अनुदानाचा पुढील टप्पा देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

दिनांक ६/२/२०२३ नुसार पात्र/ अपात्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची एकत्रित माहिती.

| जिल्हा | शासन निर्णय दिनांक ६/२/२०२३ नुसार पात्र प्रा.शा/ मा.शा/ उ.मा.शा संख्या | प्रत्यक्ष अनुदान देण्यात आलेल्या प्रा.शा/ मा.शा/ उ.मा.शा संख्या | विहीत निकषानुसार अपात्र ठरलेल्या प्रा.शा/ मा.शा/ उ.मा.शा संख्या |
|---|---|---|---|
| मुंबई | ६९ | ३१ | ३८ |
| ठाणे | ४४५ | ३३४ | १०७ |
| रायगड | १७१ | १२८ | ४७ |
| पालघर | ११९ | ७६ | ४३ |
| मुंबई विभाग | ८०४ | ५६९ | २३५ |
| पुणे | ४३७ | ३५७ | ८० |
| अहमदनगर | ४७७ | ४४४ | ३३ |
| सोलापूर | ६१९ | ५५० | ६९ |
| पुणे विभाग | १५३३ | १३५१ | १८२ |
| नाशिक | ५३८ | ४९२ | ४६ |
| जळगांव | ४८४ | ४१६ | ६८ |
| धुळे | २९६ | २३३ | ६३ |
| नंदुरबार | २८१ | २५७ | २४ |
| नाशिक विभाग | १५९९ | १३९८ | २०१ |
| कोल्हापूर | २६५ | २३१ | ३४ |
| सांगली | १५५ | १३२ | २३ |
| सातारा | १७१ | १३७ | ३४ |
| रत्नागिरी | ९३ | ७२ | २१ |
| सिंधुदूर्ग | २५ | २४ | ०१ |
| कोल्हापूर विभाग | ७०९ | ५९६ | ११३ |

| | | | |
|---|---|---|---|
| छ. संभाजीनगर | ९१६ | ७४४ | १७२ |
| जालना | ४२२ | ३६९ | ५३ |
| बीड | ५५२ | ४८५ | ६७ |
| परभणी | ५९४ | ४८५ | १०९ |
| हिंगोली | २५५ | २०४ | ५१ |
| छ. संभाजीनगर विभाग | २७३९ | २२८७ | ४५२ |
| लातूर | ३७० | ३०७ | ६३ |
| नांदेड | ४२४ | ३०६ | ११८ |
| धाराशिव | १४३ | १२५ | १८ |
| लातूर विभाग | ९३७ | ७३८ | १९९ |
| अमरावती | २२९ | १६४ | ६५ |
| अकोला | २९८ | १८७ | १११ |
| वाशिम | २५७ | २५१ | ६ |
| बुलढाणा | २९७ | २६१ | ३६ |
| यवतमाळ | ३२७ | २८३ | ४४ |
| अमरावती विभाग | १४०८ | ११४६ | २६२ |
| नागपूर | २५८ | १९९ | ५९ |
| वर्धा | ५८ | ४२ | १६ |
| भंडारा | ७४ | ६१ | १३ |
| गोंदीया | १५७ | १३२ | २५ |
| चंद्रपूर | २०६ | १८१ | २५ |
| गडचिरोली | १६१ | १२१ | ४० |
| नागपूर विभाग | ९१४ | ७३६ | १७८ |
| **एकूण** | **१०६४३** | **८८२१** | **१८२२** |

-----------------

## राज्यातील अनाथ, दिव्यांग व एच.आय.व्ही. ग्रस्त मुलींना शिधापत्रिका व शिधावाटपाची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत

**(२) * २१७४० श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ, दिव्यांग व एच.आय.व्ही. ग्रस्त मुलींना शिधापत्रिका तसेच शिधावाटप उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनाथ, दिव्यांग व एच.आय.व्ही. ग्रस्त मुलींना त्यांचे जीवन सुसह्य होण्याच्या दृष्टीकोनातून शासन स्तरावरून योग्य ते सहकार्य मिळण्याकरीता त्यांना शिधापत्रिका तसेच शिधावाटप उपलब्ध करून देण्याची मागणी राज्यस्तरीय सल्लागार समितीच्या सदस्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू मुलींना शिधापत्रिका व शिधावाटप उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे तसेच याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे. सदस्य, राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती यांनी त्यांच्या दिनांक २६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ११ अनाथ, दिव्यांग व एच.आय.व्ही. ग्रस्त मुलींना शिधापत्रिका तसेच शिधावाटप उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.
(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, पत्रात नमुद ११ मुलींचे निवासी पत्ते व संपर्क क्रमांक यांची माहितीच्या अनुषंगाने सदस्य, राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती यांचे कडे संपर्क साधून उक्त मुलींचे निवासी पत्ते, संपर्क क्रमांक व शिधापत्रिका वितरीत करण्यासाठी आवश्यक माहिती प्राप्त करून घेऊन त्यांना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. शिधापत्रिका वितरीत करणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. अनाथ, दिव्यांग व एच.आय.व्ही. ग्रस्त व इतर समाजघटकांना नियमानुसार प्रचलित पध्दतीने शिधापत्रिका वितरीत करण्यात येतात. यासाठी वेळोवेळी क्षेत्रिय कार्यालयाकडून मोहिमेचे आयोजन करून शिधापत्रिका वितरीत करून त्यावरील अनुज्ञेय लाभ देण्यात येतात.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील क्रीडा संकुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३) * २१०७९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील क्रीडा संकुलामध्ये विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉल, कबड्डी, बॉक्सिंग, बॅडमिंटन, बास्केटबॉल या विविध खेळांचा सराव करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मैदानांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून कलिना संकुलातील जलतरण तलाव देखील काही वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने पावसाच्या पाण्याने तो पूर्णत: भरला असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर खेळांसाठी तयार केलेल्या विदेशी बनावटीच्या मैदानाचीही दुरवस्था झाली असून, राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त क्रीडा संकुलाची पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे, मुंबईत मोठ्या प्रमाणात जागतिक दर्जाचे खेळाडू तयार होण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील क्रीडा संकुलाची दुरुस्ती तसेच

नुतनीकरण करून खेळाडुंकरीता आंतराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

क्रिडा संकुलातील काही भागातील टाईल्स आणि मॅपल फ्लोरींग नादुरुस्त झालेले आहे. सदर दुरुस्तीची कामे टप्याटप्याने हाती घेतलेली आहेत. कलिना संकुलातील जलतरण तलावाचा पर्यावरणीय दृष्ट्या आणि आवर्ती खर्च विचारात घेता, सदर तलावाचे काम पूर्णपणे थांबवून या जागेचा विनियोग शैक्षणिक बाबींसाठी करण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

व्हॉली बॉल, कब्बडी, बॉक्सिंग, बॅडमिंटन, बॉस्केट बॉल या खेळांसाठी तयार केलेल्या मॅपल फ्लोरींग कोपऱ्याच्या बाजूने वरती आलेले असून दुरुस्ती करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) क्रिडा संकुलाचे आतून-बाहेरुन नुतनीकरण करुन खेळांडूकरीता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने मुंबई विद्यापीठामार्फत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे समुह शाळांमध्ये रूपांतरण करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४) * २१३५६ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सत्यजीत तांबे, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांवर तसेच दुर्गम भागांमध्ये सुरू करण्यात आलेल्या आणि २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १४,७८३ शाळांचे समूह शाळांमध्ये रुपांतरण करण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक १५ ऑक्टोबर,२०२३ पर्यंत सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्तावामुळे १४,७८३ शाळा बंद होण्याची भीती निर्माण झाली असून १,८५,७६७ विद्यार्थी व २९,७०७ शिक्षकांचे भविष्याचा तसेच शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे एकत्रिकरण करुन समुह शाळा सुरु करण्याची योजना समग्र शिक्षा अभियानांतर्गत आखण्यात आली असून, २० किलोमीटर परिघासाठी एकच समूह शाळा सुरु राहणार असल्याने ग्रामीण दुर्गम भाग, तांडे, वाडी वस्ती येथील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा तसेच शाळेसाठी प्रवास करण्याचा प्रश्न निर्माण झाला असून शाळेतील विद्यार्थी विस्थापित होऊन शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली असून, सदर प्रस्तावाला अनेक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी विरोध केला असल्याचे, माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समुह शाळा सुरु झाल्यास त्याचा परिणाम कमी पटसंख्येच्या शाळा बंद होऊन शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली होणार असल्याची भीती अनेक शिक्षणतज्ज्ञ आणि मराठी भाषाप्रेमी व अभ्यासकांनी व्यक्त केली असून, या समूह शाळा करण्याच्या प्रक्रियेमध्ये १,८५,७६७ विद्यार्थी व २९,७०७ शिक्षक समुह शाळांमध्ये इतर ठिकाणी स्थलांतरित करताना शालेय शिक्षण विभागाने कोणते निकष लावले आहेत, तसेच या प्रक्रियेतून किती रुपयांचा सी.एस.आर.निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे तसेच अशा स्वरुपाचे व किती रुपयांचा निधी उभारण्याचे धोरण सदर शाळांकरीता पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता आखण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, समूह शाळा प्रस्तावाच्या निर्णयाबाबत फेरविचार करुन सदर निर्णय रद्द करण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) यासंदर्भात विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, समग्र शिक्षा अभियांनातर्गत अशी योजना विचाराधीन नाही.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सखी सावित्री समितीची स्थापना करण्याबाबत

**(५) * २१७३० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने विविध स्तरावर सखी सावित्री समिती स्थापन करण्याचे आदेश गतवर्षी शासन निर्णयाच्या माध्यमातून देऊनही अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी कोणत्याही शाळेत केंद्र आणि तालुका/शहर स्तरावर अद्याप झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास शाळांमध्ये विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थिती, पटनोंदणी, विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन, करिअर संबंधी मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती तसेच कौशल्य विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे, बालहक्क संदर्भात संहिता स्वीकारल्यानंतर बालकांच्या हक्काचे रक्षण करणे, मुलींचे रक्षण करणे, आरोग्य सुरक्षितता: इ. बाबत सखी सावित्री समितीच्या माध्यमातून काम केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सखी सावित्री समितीची सर्व शाळांमध्ये स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) शासन परिपत्रक दिनांक १० मार्च, २०२२ अन्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसीठी शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री गठीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर परिपत्रकास अनुसरुन शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) प्राथमिक, शिक्षण संचालनालयाकडून शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याबाबत दिनांक ०५/१०/२०२३ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुधागड पाली (जि.रायगड) येथील पेडली पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६) * २१६२९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड पाली (जि.रायगड) येथील सन १९८९ च्या महापुरानंतर बांधलेल्या पेडली पुलामुळे पेडली पासून आसरे, नवघर, कासारवाडी, धोंडीवली, वान्द्रोशी, कोडगाव, ठाणाळे व पुरातन वीरेश्वर मंदिर इ. ठिकाणी जाता येत असून सन १९८९ ते २०२३ या ३४ वर्षांच्या काळात या पुलाची दुरुस्ती न केल्याने सदर पुलावर खड्डे पडले असून पुलाच्या सळया बाहेर पडल्या आहेत व पुलाचे संरक्षक कठडेही तुटले असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून, सदर पुलाची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने कोसळण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजुबाजूच्या गावांतील नागरीकांना तसेच शाळा, कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पेडली पुलावरूनच ये- जा करावी लागत असून या पुलाव्यतिरिक्त या गावांकडे जाण्याऱ्येण्यास अन्य कोणताही पर्याय नाही तसेच सदर पुलाची अद्यापही दुरुस्ती न केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष असून, आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पेडली येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदरचा पुल ग्रामीण मार्ग क्र.१५ या रस्त्यावर असून देखभाल व दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद, रायगड यांच्या अखत्यारीत आहे. सदर पुल क्षतिग्रस्त झाला असून पुलाची पुनर्बांधणीचे काम सा.बां.विभागामार्फत करण्यात येत आहे.

(२) सदर पुलाच्या दुरुस्तीबाबत ग्रामस्थांकडून निवेदन प्राप्त नाही.

(३) सदर पुलाच्या पुनर्बांधणीचे काम नाबार्ड-२८ योजनेंतर्गत रक्कम रुपये २१२.९१ लक्ष करीता मंजूर करण्यात आले आहे. सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करून दिनांक २९/११/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले असून सदरचे काम ऑगस्ट, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या प्रवेशद्वाराजवळील पाच ठिकाणांवरील स्थानिक नागरिकांना टोल भरण्यापासून सवलत मिळण्याबाबत

**(७) * २१०८९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या प्रवेशद्वारावरील दहिसर, ऐरोली, वाशी, आनंदनगर आणि एलबीएस मुलुंड या पाच ठिकाणांवरील टोलनाके सन २०२७ पर्यंत कायम राहणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे मुंबईकरांची लूट होणार असल्याचा आरोप अनेक सामाजिक संस्थांनी केला असून टोलच्या प्रश्नांवर शासनाने मार्ग काढून दिलासा द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे शहरातील छोट्या वाहनांना टोल मधून सवलत देण्याची मागणी छोट्या वाहनधारकांनी केली असून एम.एच. ४ नोंदणी असलेल्या वाहनांचे चित्रीकरण सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुण्यातील खेड शिवापुर टोलनाक्याच्या धर्तीवर एम.एच. १२ व एम.एच. १३ क्रमांकाच्या वाहनांना २० किलोमीटर पर्यंतच्या परिघात टोल द्यावा लागत नाही त्यांना मासिक पास दिला जात असून, सदर धोरण मुंबई सायन मार्गावरील वाशी, ऐरोली, मुलुंड एक्सप्रेस, मुलुंड चेक नाका आणि दहिसर परिसरातील वाहनधारकांना मासिक पास देऊन सवलत देण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, मुंबईच्या प्रवेशद्वारावरील टोलच्या जाचातून स्थानिक नागरिकांची सुटका करण्यासाठी तसेच टोलनाक्याच्या परिसरात असलेल्या रस्त्यावरील खड्डे भरण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) मुंबई प्रवेश पथकर नाक्यांसाठी महाराष्ट्र शासनामार्फत अधिसुचना क्र.खाक्षेस-२००२/प्र.क्र.१५५/रस्ते-९ दिनांक २७/०९/२००२ अन्वये २५ वर्षाच्या कालावधीसाठी दिनांक ०१/१०/२००२ पासून दिनांक ३०/०९/२०२७ पर्यंत पथकर वसुलीकरीताचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.

(३) ठाणे शहरातील छोट्या वाहनांना टोल मधून सवलत देण्याची मागणी छोट्या वाहनधारकांनी केली असून मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांच्या निर्देशान्वये मुंबई प्रवेश पथकर नाक्यांवर व्हिडीओ ग्राफिक वाहतूक गणना दिनांक १६/१०/२०२३ ते दिनांक ३०/११/२०२३ व दिनांक ०४/११/२०२३ ते दिनांक १८/११/२०२३ या कालावधी मध्ये करण्यात आली आहे.
(४) शासन अधिसूचनेप्रमाणे एक पथकर नाके व पाच पथकर यांकरीता सवलतीच्या दराने मासिक पास देणेची तरतूद आहे.
(५) मुंबईतील पाच प्रवेश पथकर नाके यांचे सिक्युरिटायझेशन करणे या प्रकल्पाअंतर्गत २७ उड्डाणपुले, ४ भुयारी पादचारी मार्ग, १ रेल्वे ओव्हर ब्रीज (कांजूर मार्ग) व १ रेल्वे अंडर ब्रीज (सुमन नगर), १ खाडी पूल (ऐरोली), ४ जंक्शन यांच्या देखभाल दुरूस्ती कामांचा अंतर्भाव आहे. त्याप्रमाणे उपरोक्त बांधकामांची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करण्यात येते. तसेच सदर देखभाल दुरुस्ती अंतर्गत पथकर नाक्याच्या दोन्ही बाजूस ५० मीटर अंतरावरील रस्त्यांचा समावेश असून सदर रस्ते वेळोवेळी खड्डे विरहीत करण्यात येतात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) * २१४६४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषध प्रशासनाकडून हॉटेल, मिठाईची दुकाने आदींची तपासणी करून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत असली तरी अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे या कारवाईमध्ये सातत्य नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांद्रे येथील एका प्रसिध्द हॉटेलमध्ये चिकन थाळीत उंदिर सापडल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये निदर्शनास आली असून अन्न व औषध प्रशासन विभागाने ७२४ दुकानांची तपासणी केली असता छापेमारीत तब्बल २७६ दुकानांत भेसळयुक्त मावा, मिठाई विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाने शहरातील १८ हजार ४८१ हॉटेल्सची व दुकानांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला असून, मुंबई विभागाकरीता ४९ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पदांना मंजूरी असताना प्रत्यक्षात अन्न व औषध प्रशासनाकडे या सर्व १८ हजार ४८१ हॉटेल्सची व दुकानांची तपासणी करण्याकरीता केवळ १३ अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू विभागात मंजूर असलेल्या २०० पदांपैकी तब्बल ११८ पदे रिक्त आहेत, सहायक आयुक्त (औषधे) व अन्न व औषध व औषध प्रशासकीय सेवा या नियमांनुसार भरली जातात, परंतु मागील ३ वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण (औषधी विभाग) यांचेकडून नियम तयार करण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याने पदभरतीमध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

वांद्रे येथील एका हॉटेलमध्ये चिकन थाळीत उंदीर सापडल्याची घटना दिनांक १३/०८/२०२३ रोजी घडली असल्याचे प्रथम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई यांच्या निदर्शनास आले. सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाव्दारे या आस्थापनेविरुध्द वांद्रे पोलीस ठाणे यांनी गुन्हा दाखल करून एकूण ३ व्यक्तींना अटक करून पोलीसांनी सदर गुन्हयाचा संपूर्ण तपास पूर्ण केला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

राज्यात अन्न व औषध प्रशासनामार्फत माहे एप्रिल, २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत एकूण ८,७४९ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून खवा व मावा या अन्नपदार्थाचे १६१ व मिठाई या अन्नपदार्थांचे ५६१ असे एकूण ७२२ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी एकूण ८१ अन्न नमुने प्रमाणित, ३ कमी दर्जाचे अन्न नमुने,१ असुरक्षित नमुना आढळून आला असून उर्वरित ६३७ अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाव्दारे नियमितपणे अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात येते व तपासणी दरम्यान आस्थापनेत आढळणाऱ्या त्रुटीनुसार आस्थापनेवर नियमानुसार कारवाई करण्यात येते. अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई विभागाकरीता अन्न सुरक्षा अधिकारी यांची एकूण ४९ पदे मंजूर असून प्रत्यक्षात १३ अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत आहेत.
(४) अन्न व औषध प्रशासनातील सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक संवर्गांचे सुधारित सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून सुधारित सेवाप्रवेश नियम अधिसूचित झाल्यानंतर, सदर पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल.
(५) अन्न व औषध प्रशासनात अन्न सुरक्षा अधिकारी सदर संवर्गात रिक्त असलेली १९४ पदे भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठातील सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(९) * २१३५० श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठात झालेल्या सहायक प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी आक्षेप घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर भरती प्रक्रियेमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर भरती प्रक्रियेमधील अनियमितता दूर करुन उक्त भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) गोंडवाना विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये काही सदस्यांनी महिला आरक्षण व खेळाडू आरक्षणातील तरतूदीनुसार सहायक प्राध्यापकाची पदे भरण्यात आली नाहीत, असा आक्षेप नोंदविला होता.त्यानुसार समांतर आरक्षणानुसार खेळाडू संवर्गाकरीता पद उपलब्ध झाले नाही. तसेच महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांवरील भरतीकरीता महिला उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले नाहीत, अशी माहिती विद्यापीठाने सादर केली आहे.
(३) लागू नाही.

-----------------

## सातारा- पंढरपूर (जि.सातारा) या महामार्गाच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

**(१०) * २११४८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा- पंढरपूर (जि.सातारा) या महामार्गाच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे आतापर्यंत या रस्त्यांवरील अपघातात ६० लोकांचे बळी गेल्यामुळे मेगा इंजिनिअरिंग कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजी पासून जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कार्यालयासमोर आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेगा इंजिनिअरिंग कंपनीने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले असून, या रस्त्यांसाठी त्यांनी मुरुम व मातीचे परवानगी न घेता उत्खनन केलेले असल्याने संबंधितांविरुध्द कारवाई करावी अशी ठिय्या आंदोलन करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी मागणी केलेली आहे, ही मागणी पूर्ण न झाल्यास दिनांक २५ सप्टेंबर,२०२३ रोजी आत्मदहनचा इशारा सुध्दा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. श्री.रमेश अनिल उबाळे यांनी २० सप्टेंबर, २०२३ पासून जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले होते.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, उपोषण कर्त्यांच्या मागणी बाबत सदर राष्ट्रीय महामार्गावरील संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना त्यांचे मागणीच्या दृढीकरणासाठी कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सर्व मुद्यांची तांत्रिक पडताळणी करून उपोषण कर्त्यांना कळविण्यात आले होते. तद्नंतर उपोषण कर्त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही पाहता त्यांच्या उपोषणाच्या मुद्यात तथ्य नसल्याने उपोषण मागे घेतले व तसे १३/१०/२०२३ खुलासा पत्र सादर केले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील विश्वास नगर लेबर वसाहतीतील जागेवर प्रशासकीय संकुल उभारण्याच्या निविदेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(११) * २१६९६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील विश्वास नगर लेबर वसाहतीतील १३.५ एकर जागेवर प्रशासकीय संकुल उभारण्याकरीता १४७ कोटी रुपये शासनाने मंजूर केले असून, उक्त कामासाठी बांधकाम विभागाने १२५ कोटी रुपयांची निविदा सादर केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निविदेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये, सदर निविदा सादर केल्यानंतर दुसऱ्या दिवशीच सदरहू काम जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी निगडीत असलेल्या संस्थेच्या ठेकेदारास मिळण्याच्या दृष्टीने बदल करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करुन शुध्दीपत्रक काढताना कार्यकारी अभियंता यांनी मुख्य अभियंता यांना कोणतीही पुर्वसूचना दिली नसून शुध्दीपत्रकात ग्रीन बिल्डिंग बांधकामासह ३० कोटी रुपयापर्यंतची अट टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू निविदा रद्द करुन फेरनिविदा काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील विश्वास नगर लेबर वसाहतीतील जागेवर प्रशासकीय संकुल उभारण्याच्या कामास महसूल व वन विभागाच्या दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १४७८०.२० लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०६/०९/२०२३ रोजी सदर कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आली.

(२) काही अटी/शर्ती प्रारुप निविदेमध्ये समाविष्ट करण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर दिनांक ०९/०९/२०२३ रोजी सदर अटी/शर्ती संकेतस्थळावर टाकण्यात आल्या परंतु लोकप्रतिनिधी निगडीत संस्थेच्या ठेकेदारास काम मिळण्याच्या दृष्टीने निविदा अटी/शर्ती मध्ये बदल करण्यात आले, ही बाब खरी नाही.

(३) प्रारुप निविदेमध्ये हरीत इमारत, Joint Venture इ. बाबी समाविष्ट करण्याचे अनावधानाने राहून गेल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्व परवानगीनेच सदर अटी/शर्ती दिनांक ०९/०९/२०२३ रोजी संकेतस्थळावर upload केल्या होत्या. तसेच दिनांक २७/०९/२०२३ रोजी निविदापूर्व बैठकीमध्ये उपरोक्त अटी व शर्ती तसेच कंत्राटदाराने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने काही अटीत बदल करुन समाईक बदल संच (C.S.D.) मुख्य अभियंता यांच्या स्वाक्षरीने पुनश्च दिनांक २८/०९/२०२३ रोजी संकेतस्थळावर upload करण्यात आला.

(४) सदर निविदेमध्ये ०६ कंत्राटदारांनी भाग घेतला असून कागदपत्राची तपासणी अंतिम टप्प्यात आहे. कंत्राटदारांच्या पात्र/अपात्रतेचा निर्णय अद्यापपर्यंत अंतिम झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संच मान्यतेमधील त्रुटींची पुर्तता करुन अनुदान देण्याबाबत

**(१२) * २१०६१ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम दिनांक १ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला असून, शाळेतील ६० विद्यार्थ्यांमागे २ शिक्षक, तसेच यानंतर वाढ होणाऱ्या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त शिक्षक देण्यात येतो असे संच मान्यतेचे नवीन निकष निश्चित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ च्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संचमान्यता सदोष असल्याने अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे कमी झाल्यामुळे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त होत असून नवीन अनुदानावर येत असलेले शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अनुदानापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संच मान्यतामधील त्रुटींची पुर्तता करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सन २०२२-२३ च्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संचमान्यतेत त्रुटी/दोष आढळून आल्यास त्या दुरुस्त करुन देण्याची कार्यवाही संचालक स्तरावरुन केली जात आहे. तसेच, संचमान्यतेमुळे कोणतीही शाळा अनुदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुदान घेत असलेल्या शाळांना वाढीव टप्पा अनुज्ञेय करताना आधार प्रमाणित विद्यार्थी संख्या विचारात घेता, अनुज्ञेय शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या कमी होत असल्यास, अशा कमी होणाऱ्या पदांना वेतन अनुदानाचा वाढीव टप्पा अनुज्ञेय करण्याचे निर्देश दिनांक २०/०७/२०२३ च्या बैठकीत देण्यात आले आहेत.

अनुदानासाठी पात्र शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना अनुदान तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रक दिनांक २४/०४/२०२३ अन्वये कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना शासन स्तरावरुन दिनांक ०९/११/२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात संत्रा निर्यात सुविधा केंद्र निर्माण करणेबाबत

**(१३)** * **२१३४६ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात मोठ्या प्रमाणावर निर्यातक्षम संत्रा उत्पादन होत असूनही शासनाने अद्याप एकही निर्यात सुविधा केंद्र राज्यात निर्माण केले नसल्याने संत्रा उद्योगावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे, माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री तसेच मा.उद्योग मंत्री यांच्याकडे लेखी पाठपुरावा करून निर्यात सुविधा केंद्र निर्माण करणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संत्रा निर्यात केंद्रांतर्गत ग्रेडिंग, कोटिंग, पॅकिंग, लोडींग आदींबाबत मार्गदर्शन तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या मदतीने सहकार्य उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) विदर्भात मोठ्या प्रमाणावर निर्यातक्षम संत्र्यांचे उत्पादन होते, हे खरे आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत राज्यात फळे, फुले व भाजीपाल्यासाठी एकूण ४५ आधुनिक निर्यात सुविधा केंद्रे कार्यरत आहेत. त्यापैकी विदर्भात ७ निर्यात सुविधा केंद्र असून, विशेषत: संत्र्यांसाठी कारंजा घाडगे, जि.वर्धा व वरुड, जि.अमरावती येथे संत्रा निर्यात सुविधा केंद्रे कार्यरत असल्याने, संत्रा उद्योगावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

उद्योग विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, निर्यात सुविधा केंद्र निर्माण करणेबाबत मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) केंद्र व राज्य शासनाच्या सहायाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून संत्रा निर्यात करण्यासाठी उभारण्यात आलेल्या संत्रा निर्यात सुविधा केंद्रांमध्ये प्रि-कुलिंग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस व ग्रेडींग लाईन इ. सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुल्यांकन झालेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदान मंजूर करणेबाबत

**(१४) * २१३०० श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १४०२१ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांचे मुल्यांकन उशिरा झाल्याने अनुदान मंजुरीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी निकषांची पूर्तता केली असून त्यांना अद्यापही अनुदान मिळालेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांना अनुदानास पात्र ठरविण्याचा प्रस्ताव दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून, सदरहू प्रस्तावामध्ये त्रुटी असलेल्या शाळांना त्रुटीं पुर्तता करण्याची संधी देऊन त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांची माहिती दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना कळविण्यात आले असून याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुल्यांकन केलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत तसेच त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २/२/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या यादीतील त्रुटीत असलेल्या शाळांची त्रुटी पुर्तता करुन, ३० जून, २०२२ पर्यंत एकत्रित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिनांक १४/६/२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, दिनांक ११/११/२०२२ पर्यंत त्रुटी पुर्तता केलेल्या घोषित/ अघोषित शाळांचा अनुदान पात्र यादीत समावेश करण्यात आला असून, सदरहु शाळांना शासन निर्णय, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये, १/१/२०२३ पासून विहीत अटी व शर्तीनुसार अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये, विहीत अटी व शर्तीची तपासणी करुन मुल्यांकनपात्र शाळांना अनुदान मंजूर करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) / विभागीय शिक्षण उपसंचालक यांना प्रदान करण्यात आले असून, त्यानुसार पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर कार्यवाही दिनांक ३१/१२/२०२३ पावेतो पूर्ण करण्याच्या सूचना मा.मंत्री महोदयांनी दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## महाराष्ट्र खाजगी शिकवणी कायदा तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५) * २१५६६ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या खाजगी शिकवणी वर्गाचे अर्थकारण, विद्यार्थ्यांची होत असलेली पिळवणूक लक्षात घेता त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी ‘महाराष्ट्र खाजगी शिकवणी अधिनियम कायदा’ तयार करण्याचा निर्णय पाच वर्षांपूर्वी तत्कालीन शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ ली ते १२ वी पर्यंतच्या खाजगी शिकवणी वर्गांसाठी लागू असणाऱ्या या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी तत्कालीन शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बारा सदस्यांची समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने याबाबतचा मसुदा शासनास सादर केला असून, सदरहू मसुदयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र खाजगी शिकवणी कायदा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर मसुद्याव्दारे खाजगी शिकवणी वर्गाची नोंदणी, नुतनीकरण करणे, नोंदणी रद्द करणे, विद्यार्थी संख्या निश्चित करणे, दुहेरी शिकवणीस प्रतिबंध करणे, शाळा व कोचिंग क्लास संलग्निकरणास प्रतिबंध करणे, दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीना प्रतिबंध करणे, खाजगी शिकवणी वर्गासाठी आवश्यक भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, फी आकारणी करणे इत्यादी तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(४) समितीने सादर केलेला मसुदा शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जेएनपीटी बंदरातून आयात केलेल्या बनावट बायोडिझेल व पेट्रोलियम पदार्थांची अवैध विक्री करणाऱ्या तत्कालीन नियंत्रक-शिधावाटप व आयातदार यांचेवर कारवाई करणेबाबत

**(१६) * २१३६८ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये जेएनपीटी बंदरातून आयात केलेल्या बनावट बायोडिझेलची अवैध विक्री करणारे विक्रेते आणि संबंधित आयातदार यांच्याशी तत्कालीन नियंत्रक - शिधावाटप आणि

संचालक, अन्न व नागरी पुरवठा यांनी संगनमत करून कोट्यावधी रुपयांच्या शासनाच्या महसुलाचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट बायोडिझेल हे जेएनपीटी बंदरामध्ये मिक्स मिनरल हायड्रोकार्बन ऑइल तसेच इंडस्ट्रीयल फर्नेस ऑईल अशा विविध नावाने आयातदार आयात करत असून, सदर पेट्रोलियम पदार्थ हा मोठ्या उद्योगधंद्यांमध्ये फर्नेस ऑईल किंवा बॉयलर फ्युएल म्हणून वापरणे अपेक्षित असताना सदर बायोडिझेलचा वापर मोठ्या वाहनांमध्ये डिझेल म्हणून पर्यायी इंधन स्वरूपात केला जात असल्याने बाजारातील डिझेलपेक्षा ते खूपच स्वस्त दरात आयात केले जात असून, सन २०२० ते २०२२ या दरम्यान सदर बोगस बायोडिझेलची आयात केली जात होती, तसेच सदर सदर बनावट बायोडिझेलची वाहनांमध्ये पर्यायी डिझेल म्हणून विक्री केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयातदार व विक्रेता यांनी नफा कमविला असून, सदर काळामध्ये शासकीय पेट्रोलियम कंपन्या HPCL, BPCL, IOCL यांच्या डिझेल विक्रीमध्ये जवळपास ५०% तफावत आढळून आल्यानंतर सदर कंपन्यांचे प्रतिनिधी आणि राज्याचे मुख्य सचिव व संबंधित अधिकारी यांनी एकत्रित बैठक घेऊन बनावट बायोडिझेलची विक्री करणाऱ्या आयतदार आणि विक्रेता यांच्यावर कारवाईचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन नियंत्रक, शिधावाटप यांच्या नेतृत्वाखाली बनावट बायोडिझेलची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करणेकरीता भरारी पथकाची स्थापना करण्यात आली परंतु तत्कालीन नियंत्रक शिधावाटप यांनी सदर बनावट बायोडिझेलचे आयातदार आणि विविध जिल्ह्यांतील विक्रेता यांच्याबरोबर संधान साधून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तत्कालीन नियंत्रक शिधावाटप आणि संचालक, अन्न व नागरी पुरवठा यांनी बनावट बायोडिझेलचे आयातदार आणि विविध जिल्ह्यांतील विक्रेते यांच्या बरोबर संधान साधून गैरव्यवहार केला असून, सदर दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) राज्यामध्ये पेट्रोलियम पदार्थांच्या अवैध व्यापाराची बाब निदर्शनास आल्यामुळे दिनांक १६/११/२०२१ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बायोडिझेल व पेट्रोलियम पदार्थांच्या अवैध विक्रीच्या अनुषंगाने सदर बैठकीमध्ये शासन परिपत्रक दिनांक १२/११/२०२१ च्या अनुषंगाने शासनाच्या विविध यंत्रणांना एकत्रित कारवाई करण्याचे निदेश दिले आहेत.

(४) शासन निर्णय दिनांक १०/११/२०१६ अन्वये राज्यामध्ये पेट्रोलियम पदार्थांच्या तपासण्या करण्याकरीता राज्यस्तरीय दक्षता पथक गठीत करण्यात आले आहे.

हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापुर-मंगळवेढा महामार्गावरील सेवा रस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१७) * २२१८२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी-नागपूर या राष्ट्रीय महामार्ग क्र १६६ वरील सोलापूर - मंगळवेढा दरम्यान नवीन महामार्गाला भेगा पडलेल्या असून बेगमपूर व सोहळे गावाजवळील सेवा रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने काही दिवसांपूर्वी सोहळे येथील दोन व्यक्ती अपघातात मृत्यूमुखी पडल्याची घटना घडलेली असून सेवा रस्त्याअभावी असून सेवा रस्त्साठी मागील वर्षी या ठिकाणी रस्ता रोको आंदोलनही झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर पडलेल्या भेगा, ड्रेनेज सिस्टीम, सेवा रस्त्याची अपूर्णावस्थेतील कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर महामार्ग हा केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.

हे अंशत: खरे आहे.

या महामार्गावर काही ठिकाणी छोटे तडे दिसत होते. परंतु त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात आली आहे व सद्य:स्थितीत वाहतूक सुरळीत चालू आहे.

बेगमपूर गावाजवळ सेवारस्ता हा करारनाम्यातील तरतुदीनुसार पूर्ण करण्यात आला आहे. सोहाळे येथील महामार्गाच्या डाव्या बाजूचे सेवा रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उजव्या बाजूच्या सेवा रस्त्याच्या कामाकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी जमीनधारकांनी मा.उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन दाखल केले असल्याने या ठिकाणी काम करता आलेले नाही. सद्य:स्थितीत सदर सेवा रस्ता उद्योजकाच्या मूळ करारनाम्यातून वगळण्यात आलेला आहे.

पोलीस अहवालानुसार सेवा रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे सोहाळे येथे दोन व्यक्ती अपघातामध्ये मयत झालेले नाहीत. सोहाळे येथील ग्रामस्थांनी माहे सप्टेबर २०२२ व माहे जानेवारी २०२३ मध्ये रस्ता रोको आंदोलन केलेले आहे.

(२) सांगली-सोलापूर महामार्गावरील मंगळवेढा ते सोलापूर या लांबीमधील ड्रेनेजचे काम, सेवा रस्त्याचे काम व इतर कामे हे उद्योजकाच्या करारनाम्यातील व आय आर सी च्या मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहेत. सोहाळे येथील उजव्या बाजूच्या सेवा रस्त्याचे काम मा.न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध जिल्हयांतील दिव्यांगांच्या तसेच विशेष शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१८) * २१२१७ श्री.अरुण लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश**

**कराड, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध जिल्हयांतील अस्थिव्यंग, मूकबधिर, कर्णबधिर आणि अन्य दिव्यांग यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी तसेच सदर दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्यापनाचे कार्य करणाऱ्या विशेष शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने, सदर विशेष शिक्षकांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी मुंबई येथील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनातील आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने त्याच दिवशी मंत्रालयात दिव्यांग खात्याचे मा.सचिव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले असून मा.सचिवांनी दिव्यांगांचे सर्व प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात समग्र शिक्षा अभियानांतर्गत विशेष शिक्षकांकडून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचे कार्य केले जात असून राज्यात सुमारे १,७७५ विशेष कार्यरत शिक्षकांना श्रेणीनुसार वेतन द्यावे, त्यांना नियमित समान काम समान वेतन या नियमाप्रमाणे पूर्ण वेतन दिले जावे तसेच ८३० विशेष शिक्षकांची नियुक्ती करण्यापूर्वी सेवेत असलेल्या विशेष शिक्षकांचे समायोजन करावे अशा आशयाच्या मागण्या विशेष शिक्षकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील दिव्यांगांच्या तसेच दिव्यांगांना अध्ययन करणाऱ्या विशेष शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

राज्यातील विविध सन्मा.लोकप्रतिनिधी तसेच विविध विशेष शिक्षक यांनी त्यांच्या संघटनांमार्फत निवेदने सादर केले आहेत.

(४) या प्रकरणी मा.मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/१०/२०२३ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये अपंग एकात्म शिक्षण योजना (प्राथमिक स्तर) अंतर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत १७७५ विशेष शिक्षकांचे समायोजन केल्यास शासनाच्या इतर विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यामधून अशा पध्दतीने समायोजन करण्याची मागणी निर्माण होईल यामुळे या कंत्राटी शिक्षकांचे समायोजन करणे व्यवहार्य होणार नाही. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील विशेष अनुज्ञ याचिका क्र.१३२/२०१६ मधील निर्णयानुसार पदनिर्मीती झाल्यानंतर नेमके किती विशेष शिक्षक आवश्यक आहेत ते पाहून येथोचित कार्यवाही करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ठेकेदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(१९) * २१९९२ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ठेकेदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले असून, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अंतर्गत येणाऱ्या शिवडी, नायगाव, डीलाईल रोड आणि वरळी येथील ठेकेदारी पध्दतीवर सन २०१० पासून शेकडो सफाई कर्मचारी काम करीत असतानाही त्यांना वेळेवर वेतन आणि किमान वेतन कायद्यानुसार पगार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि मार्गदर्शक सूचनांच्या नियमानुसार रुपये ६२५ प्रतिदिन मोबदला देणे गरजेचे असतानाही त्यांना कमी मोबदला दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणत्या उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अंतर्गत येणाऱ्या शिवडी, नायगाव, डीलाईल रोड आणि वरळी येथील चाळींच्या स्वच्छतेकरीता सफाई कामगारांची एकूण २९२ पदे मंजूर होती. काळानुरुप सफाई कामगार सेवानिवृत्त झाल्याने ही पदे व्यपगत होऊन सद्य:स्थितीत २० सफाई कामगारांची पदे अस्तित्वात आहेत. सफाई कामगारांची पदे व्यपगत झाल्यामुळे चाळींच्या स्वच्छतेकरीता पुरेसा सफाई कामगार वर्ग नसल्याने सन २०१५-१६ पासून प्रत्येक आर्थिक वर्षात खुल्या निविदा प्रक्रियेनुसार ठेकेदारांची नेमणूक करण्यात येते. सदर निविदेतील अटी व शर्तीनुसार कामगारांना किमान वेतन वेळेवर देण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची आहे. दिनांक २५/०८/२०२३ रोजी सफाई कामगारांनी आझाद मैदान येथे आंदोलन केले आहे.

(३) व्यवस्थापक विकास विभाग चाळी यांचे स्तरावर दिनांक २७/०७/२०२३ रोजी व दिनांक ०१/०९/२०२३ रोजी कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई सा.बां. विभाग, वरळी यांचे स्तरावर संबंधित ठेकेदार व संघटनेचे प्रतिनिधी यांचे समवेत बैठक घेण्यात येऊन निविदेतील अटी व शर्तीनुसार नियमित व किमान वेतन वेळेवर देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तापी नदीवरील सारंगखेडा पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) * २२०५२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार आणि धुळे जिल्ह्याला जोडणाऱ्या तापी नदीवरील सारंगखेडा पुल १०० वर्षे जुना असल्याने पुलाला भेगा पडून पुलाची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी नदीवर सारंगखेड्याजवळील सदर पुलाचे आयुर्मान संपले असतानाही तो वाहतुकीस खुला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत किंवा पुल निष्कासित करून नवीन पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) पुलाच्या पोचमार्गाची दुरावस्था झाली आहे, हे अंशत: खरे आहे.

सदर महामार्ग हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे आहे.

सदर पुलाचे बांधकाम सन १९५९ मध्ये झाले असल्यामुळे पुलास अद्याप १०० वर्षे झालेली नाहीत.

माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये हतनूर धरणातून सोडण्यात आलेल्या अतिविसर्गामुळे सारंगखेडा बॅरेजचे सर्व दरवाजे एकाचवेळी उघडण्यात आले. त्यामुळे पाण्याच्या पातळीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन पुलाच्या टाकरखेडा बाजूच्या पोच मार्गाचा भराव खचला होता.सदर पुलाची पाहणी सक्षम अधिकारी यांनी केली असून मूळ पुलास भेगा अथवा तडे पडलेले नाहीत तसेच पुलाच्या पोच मार्गाच्या तात्पुरत्या दुरुस्तीचे काम पूर्ण केले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत व सकृतदर्शनी पुल सुस्थितीत आहे. सदर पुलाचा पोच मार्ग सुस्थितीत राहावा म्हणून कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी व पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी प्रस्ताव संकल्पचित्र मंडळास माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये सादर केला आहे. पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार पुलाची दुरुस्ती व पुलाचा पोच मार्ग सुस्थितीत राहण्यासाठीच्या कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षकांना वैयक्तीक मान्यता देण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्राची अट रद्द करण्याबाबत

**(२१) * २१८८४ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये अनेक अनुदान तत्त्वावरचे शिक्षक पवित्र पोर्टल सुरु होण्याच्या अगोदरपासून विनाअनुदान तत्वावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना १० जून, २०२२ रोजीच्या शासन आदेशानुसार वैयक्तिक मान्यता घेताना एनओसी घेणे बंधनकारक असल्याचे आदेशामध्ये नमूद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा विनाअनुदानित शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता शिक्षण अधिकारी व उपसंचालक कार्यालयाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यातील अनेक शाळांनी एनओसी घेण्यासाठी पाठपुरावा केला, परंतु एनओसी न मिळाल्याने विनाअनुदानित शिक्षक वैयक्तिक मान्यतेपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विनाअनुदानित तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या भविष्याचा विचार करून एनओसीची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) पवित्र प्रणालीद्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेव्यतिरिक्त होणाऱ्या भरती प्रकरणांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी संबंधित पदाबाबतची बिंदूनामावली संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून पडताळणी करुन घेतली आहे किंवा कसे याची खात्री केली जाते. त्यामुळे पदभरती आरक्षण धोरणानुसार होण्यासाठी पदभरतीकरीता जाहिरातीस परवानगी घेणे दिनांक ०६/०२/२०१२ व तद्नंतर दिनांक १०/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनिवार्य आहे. तथापि, दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुदानास पात्र ठरणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधित पदांची जाहिरात देण्यासाठी परवानगी घेतली नसेल, तरी सदरहू जाहिरात किमान जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये दिलेली असल्यास ती जाहिरात ग्राह्य धरण्याबाबत शासन पत्र दिनांक २६/०९/२०२३ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा ग्रंथालयामध्ये भौतिक सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(२२) * २१९३९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालयामध्ये विविध विषयांच्या अभ्यासाकरीता पूर्ण जिल्ह्यातून विद्यार्थी येत असतात, परंतु ग्रंथालयात अनेक भौतिक सुविधांचा अभाव असल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांनी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी विविध मागण्यांकरीता ग्रंथालय प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करुन त्या सोडविण्याची

मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालयातील भौतिक सुविधांचा असलेला अभाव दुर करण्याच्या विद्यार्थ्यांच्या या मागण्यांसदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्हा ग्रंथालयामध्ये माहे ऑगस्ट-२०२३ पासून नियमित विद्यार्थ्याव्यतिरिक्त ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थी संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. तसेच, शहरातील इतर सार्वजनिक ग्रंथालयाच्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी (मंगळवार) जिल्हा ग्रंथालयामध्ये विद्यार्थी संख्येत वाढ होत असते. त्यामुळे सदर दिवशी ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत भौतिक सुविधांचा तुटवडा निर्माण होत असतो.
(२) होय, हे खरे आहे.

अशी चर्चा दिनांक १०/१०/२०२३ रोजी झाली होती.
(३) विद्यार्थ्यांची अभ्यासिकेतील वाढती संख्या लक्षात घेऊन जिल्हा वार्षिक योजनामधून अभ्यासिकेत भौतिक सुविधा आणि सध्याच्या इमारतीच्या ठिकाणी नवीन विस्तारित स्पर्धा परीक्षा विभाग, बहुउद्देशीय सभागृह बहुमजली बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती, अकोला यांचेकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून विविध महामार्गांवरील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याबाबत

**(२३) * २२१०० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी बायपास ठाणे- मुंबई- नाशिक महामार्गावर सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरणामुळे माजिवाडा ते वडपे बायपास महामार्गावरील मोठ्या प्रमाणातील खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत असून भिवंडी ते ठाणे ह्या १८ किलोमीटरच्या प्रवासाला दोन ते तीन तासांचा वेळ लागत असल्याने चालक त्रस्त झाले असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी प्राधिकरणामार्फत विविध कामे प्रस्तावित करण्यात आली असून याकरीता सल्लागाराची नियुक्ती करुन त्यांचेमार्फत सुसाध्यता तपासणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे इ. प्रक्रिया प्राधिकरण स्तरावर सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या बारा पदरी रुंदीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळकडून संथ गतीने सुरू असून साकेत उड्डाणपुलाच्या बेअरिंगचा भाग निखळल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गाप्रमाणे सदर रस्त्यांची स्थिती होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, भिवंडी बायपास ठाणे, मुंबई, नाशिक महामार्गावर सुरू असलेले १२ पदरी रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर भागातील वाहतूक कोंडीच्या नियोजनाबद्दल ठाणे वाहतूक पोलिसांनी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे,

माहे मे, २०२३ मध्ये कळवा शिळफाटा रस्त्यावरील उड्डाण पुलाची दुरुस्ती तसेच भिवंडी बायपास मुंबई नाशिक महामार्गावरील साकेत व कशेळी पुलाच्या मास्टिक अस्फाल्टचे काम सुरू होते. त्यासाठी वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतुकीचे नियोजन करण्यात आले होते. भिवंडी बायपास मुंबई नाशिक महामार्गावरील वाहन वर्दळ ही अस्तित्वातील रस्त्याच्या वाहन क्षमतेपेक्षा जास्त असल्याने काही भागात वाहतूक कोंडी होते.
(२) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण केंद्र सरकार यांच्या अखत्यारीत ठाणे ते वडपे (भिवंडी बायपास) या महामार्गाचे आठ पदरी रस्त्याचे काम प्रगतीत आहे. सदरचे कामास सध्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ हे "उद्योजक" आहेत. सद्य:स्थितीत ४०% काम झाले असून माहे सप्टेंबर-२०२४ पर्यंत उर्वरीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) हे खरे नाही.

वडपे ते ठाणे महामार्ग क्र. ०३ (भिवंडी बायपास) हा रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण ठाणे यांचे अखत्यारीत आहे. या रस्त्याचे ८ पदरीकरणाचे कामास महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास हे माहे जून, २०२१ पासून नवीन उद्योजक म्हणून नेमणूक केली आहे. महामंडळामार्फत कामास सुरुवात करण्यात आली असून सद्य:स्थितीत ४० % काम पूर्ण झाले आहे. मुंबई नाशिक महामार्गावरील साकेत खाडी पुलाच्या एका ठिकाणी बेअरिंगचा वरील बीमचा भाग दिनांक २३/०८/२०२३ रोजी निखळला होता.सदरच्या निखळलेल्या भागाची दिनांक २३/०८/२०२३ ते २६/०८/२०२३ या दरम्यान दुरुस्ती करण्यात आली असून, रहदारी सुरळीत सुरु आहे.
(४) वडपे ते ठाणे महामार्गाचे ८ पदरीकरणाचे कामाकरीता महामंडळाने ईपीसी कंत्राटदाराची नेमणूक केली असून या कामावर एकूण ३ उपकंत्राटदार कार्यरत आहेत. कामाचे प्रगतीसाठी मासिक नियोजन आराखडा तयार करण्यात आला असून प्रकल्पाचे विहित कालावधीत म्हणजेच माहे सप्टेंबर, २०२४ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रुंदीकरणाच्या कामाच्या दरम्यान वाहतूक सुरळीत ठेवणेसाठी पोलीस विभागाच्या सहकार्याने वाहतूक नियोजन आराखडा तयार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांबाबत

**(२४) * २१०७२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट - सेट, एम.फील, कॅस, पी. एच डी वेतनवाढ, प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ यांसारख्या इतर विविध प्रश्नांसाठी संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नांबाबत मा.उच्च शिक्षण मंत्री महोदयांनी आपल्या दालनात मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व प्राध्यापक संघटनांसोबत माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीने प्रलंबित प्रश्नांसाठी केलेल्या शिफारशीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, मा.मंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशानुसार तसेच अहवालातील शिफारशींनुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) समितीने शिक्षकीय/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे / थकबाकी प्रदान करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करणे इत्यादी स्वरुपाच्या शिफारशी केल्या आहेत.
(४) मा.मंत्री महोदयांनी बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार रिफ्रेशर, ओरिएंटेशन व शॉर्ट टर्म कोर्स पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यासंदर्भातील प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. तसेच एम.फिल पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करण्याच्या अनुषंगाने अधिकचे स्पष्टीकरण देण्याची कार्यवाही सुरु आहे. संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करणे व सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इतर शिफारशीसंदर्भात नियमानुसार तपासून सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाकडून मुलींच्या शिक्षणाकरीता मिळणाऱ्या सवलती व योजनांचा लाभ नाकारण्याचा पर्याय उपलब्ध करून देणेबाबत

**(२५) * २१७५१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक शुल्क माफी, इ. विविध योजना राबविल्या जातात व राज्यातील सर्वच मुलींना सदरहू योजनांचा लाभ हा सरसकट देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून मिळणाऱ्या सवलती, लाभ स्वेच्छेने नाकारण्यात येणाऱ्या नागरिकांना त्या स्वेच्छेने नाकारण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत येत्या २ महिन्यांत कार्यवाही करण्यात येईल असे मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात चर्चेदरम्यान सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच धर्तीवर ज्या मुलींचे कुटुंब त्यांच्या मुलींचे शैक्षणिक शुल्क भरण्यास सक्षम असतील, ज्यांना शासनाच्या योजनांच्या लाभाची आवश्यकता नाही व असा लाभ ते स्वेच्छेने नाकारू इच्छितात त्यांना तसा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असा पर्याय उपलब्ध करून दिल्यास मुलींच्या शिक्षणाकरीता त्यांच्या पालकांकडून जमा होणारे शैक्षणिक शुल्क अन्य गरजू विद्यार्थीनींच्या शिक्षणाकरीता वापरणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून या प्रकरणी शासन किती कालावधीत निर्णय घेणार आहे ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाची, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी, महाराष्ट्र शासनाच्या महा-डीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईनरित्या राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत शिष्यवृत्तीकरीता शिक्षण शुल्क रकमेच्या ५० टक्के व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के इतका लाभ दोन हप्त्यांमध्ये लाभार्थ्यांना देण्यात येत आहे. सदर योजनेच्या लाभाकरीता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पेक्षा जास्त नसावे, अशी अट आहे.

सदर योजना महा-डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईनरित्या राबविण्यात येत असून सदर योजनेचा लाभ सरसकट देण्यात येत नाही. सदर योजनेच्या लाभासाठी, लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्याला महा-डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा लागतो व संस्थांना भरलेल्या अर्जाची छानणी (मंजूर/नामंजूर) ऑनलाईन करावी लागते. मंजूर व अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना मंजूर रक्कम त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदन उच्च व तंत्र शिक्षण विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी जुलै, २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी दिनांक ०४/१२/२०२३ रोजी बैठक घेतली आहे. महा-आयटीकडून चालविण्यात येणाऱ्या महा-डीबीटी पोर्टलवर योजनांचा लाभ स्वेच्छेने नाकारण्याचा पर्याय १ महिन्यात उपलब्ध करुन देण्याचे निर्देश माहिती व तंत्रज्ञान विभागास वरील बैठकीत दिले आहेत.

-----------------

## मुंबई विद्यापीठाद्वारे एम.कॉम., एम.ए., एम.एससी., बी.एड अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे आणि पुनर्मुल्यांकनांचे निकाल जाहीर करण्याबाबत

**(२६) * २१०७७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) एम.कॉम. परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी अद्यापही करण्यात आली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये तसेच मुंबई विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या एम.ए., एम.एससी. अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे आणि पुनर्मुल्यांकनांचे निकाल आजमितिपर्यंत जाहीर करण्यात आले नाहीत तसेच बी.एड. द्वितीय सत्राची परीक्षा होऊन २६५ दिवस होऊनही अद्याप निकाल जाहीर करण्यात आले नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिक्षांचा निकाल तिसऱ्या सत्राची परीक्षा झाल्यानंतरही पाच महिन्यांचा काळ उलटूनही जाहीर झाला नसून, विधी शाखेच्या एका विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाकडे सुमारे एक महिन्यापूर्वी उत्तरपत्रिकेच्या नक्कलप्रतीची मागणी केली असतानाही मुंबई विद्यापीठाकडून आजमितिपर्यंत नक्कलप्रत देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाने आयडॉलच्या जुलै सत्राच्या एम.कॉम.परीक्षेच्या चौथ्या म्हणजेच अंतिम सत्राच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्ण केली, त्यानंतर अंतिम निकाल जाहीर करताना तिसऱ्या सत्राच्या उत्तरपत्रिकांची तपासणीच पूर्ण झाली नसल्याचे तसेच एप्रिलमध्ये परीक्षा संपलेल्या एम.कॉम. सत्र तीन अभ्यासक्रमाच्या सुमारे १० हजारांहून अधिक उत्तरपत्रिका तपासणीविना पडून राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या एम.ए., एम.एससी. बीएड अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे आणि पुनर्मुल्यांकनांचे निकाल जाहीर करण्याबाबत, तसेच विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकाच्या नक्कलप्रती तातडीने वितरित करण्याबाबत व दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) एम.कॉम.परिक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाने सादर केलेल्या माहितीनुसार मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) एम.कॉम. सत्र ४ ची परीक्षा दिनांक २९/०३/२०२३ ते दिनांक ०६/०४/२०२३ या कालावधीत संपन्न झाली सदर परिक्षेचा निकाल दिनांक १७/११/२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

उन्हाळी सत्र २०२३ एम.एस्सी. सत्र ४ ची परीक्षा दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३ या कालावधीत संपन्न झाली असून सदर परिक्षेचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थी वेगवेगळ्या वेळी अर्ज सादर करतात व सदर निकाल वेगवेगळया वेळी जाहीर होतात. यातील बहुतांश विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकनाचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.

तसेच एम.ए. सत्र ४ ची परीक्षा दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक ०७/०७/२०२३ या कालावधीत संपन्न झाली असून सदर परिक्षेचे निकाल जाहीर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

उन्हाळी सत्र २०२२ मधील बीएड च्या द्वितीय सत्राची परीक्षा माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये संपन्न झाली होती परंतु, बीएड अभ्यासक्रमांसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्येच्या प्रमाणात नियमित तसेच तासिका तत्वावरील शिक्षक कमी संख्येने उपलब्ध असल्याने उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन वेळेत न झाल्यामुळे सदर परिक्षेचा निकाल दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

उन्हाळी सत्र २०२३ मधील बीएड च्या द्वितीय सत्राची परीक्षा ही माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये घेण्यात आली असून सदर परिक्षेचा निकाल विहित कालावधीत दिनांक २७/१०/२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

एम.कॉम सत्र ३ ची परीक्षा २८/०३/२०२३ ते दिनांक १०/०४/२०२३ या कालावधीत संपन्न झाली असून सदर परिक्षेचा निकाल दिनांक १८/११/२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

विधी शाखेच्या कोणत्याही विद्यार्थ्याची मुंबई विद्यापीठाकडे उत्तरपत्रिकेची नक्कलप्रतीची मागणी केल्या संदर्भातील कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

दूर मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल) व विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागांमध्ये नियमित शिक्षकांची कमतरता असल्यामुळे उत्तर पुस्तिकांच्या मुल्यांकनासाठी वेळ लागत आहे.

(४) उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन जलद गतीने होण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील वरिष्ठ प्राचार्य व शिक्षक यांची सल्लागर म्हणून नियुक्ती विद्यापीठाकडून करण्यात आली आहे. तसेच, यासाठी विद्यापीठाकडून समूह महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय परिक्षांचे निकाल विहित मुदतीत जाहीर करण्यासाठी परिक्षेदरम्यान विद्यार्थ्यांचे ऑनलाईन हजेरी नोंद करणे, उत्तरपुस्तिकेवर QR code चा वापर तसेच परीक्षा कामकाजाचा आढावा घेण्यासाठी Dashboard ची निर्मिती इत्यादी तांत्रिक उपाययोजना केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कॅम्पस परिसरामध्ये टेक्नॉलॉजी ॲण्ड एनर्जी पार्क उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * २१३२२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या कॅम्पस परिसरामध्ये औषधीशास्त्र विभागाच्या जागेवर ३१ कोटी रुपयांचे टेक्नॉलॉजी ॲण्ड एनर्जी पार्क उभारण्याचा प्रस्ताव गेल्या वर्षी सन २०२२ मध्ये मंजुरीकरीता पाठविण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या किती किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे,

(३) असल्यास, टेक्नॉलॉजी ॲण्ड एनर्जी पार्कबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत तसेच इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) टेक्नॉलॉजी ॲड एनर्जी पार्क इमारत बांधकामाचे रुपये ५६१९.०० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी विद्यापीठाने शासनास सादर केले होते. सदरहू अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननी अंती रुपये ४४१२.४३ लक्ष इतकी किंमत निश्चित केली आहे. तसेच उच्चस्तरीय सचिव समितीने या कामाच्या रुपये ४४१२.४३ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. तदनुषंगाने टेक्नॉलॉजी ॲड एनर्जी पार्क इमारत बांधकामाच्या रुपये ४४१२.४३ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०१/११/२०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) वित्त विभागाने टेक्नॉलॉजी ॲड एनर्जी पार्क इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन दिल्यानुसार दिनांक २९/११/२०२३ च्या शासन निर्णयान्वये रुपये २०००.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील सावित्री खाडीवर बांधण्यात आलेल्या आंबेत पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८)** * **२१६१५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्री खाडीवर १२ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या आंबेत पुलाची दुरुस्ती करण्याकरीता अवघ्या आठ महिन्यांत पुन्हा १६ कोटी रुपये मंजूर करावे लागले असून, रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा सदर पूल धोकादायक झाल्यामुळे वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने नागरिकांना व शाळकरी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनांही गैरसोयीचे होत असून आंबेतसह, म्हाप्रळ, मंडणगड, दापोलीकर नागरिकांची गैरसोय होत असून त्यांना फेरी बोटीतूनच ये-जा करावी लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असून सावित्री खाडीत मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन केले जात असल्यामुळे सदर पुलाला तडे गेल्याने मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करूनही अद्याप पुलाच्या काम पूर्ण न झाल्यामुळे पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सावित्री नदीच्या खाडीपात्रात होत असलेल्या अवैध रेती उत्खननाबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर पुलाच्या संरचनात्मक परिक्षणातील निष्कर्षाच्या अनुषंगाने सुपर स्ट्रक्चर दुरुस्तीचे रक्कम रुपये १२.०० कोटीची आवश्यक कामे करण्यात आली आहेत.
तद्नंतर, पुलाचा पिअर क्षतिग्रस्त झाल्याचे निदर्शनास आल्याने आवश्यक संरचनात्मक दुरुस्तीची रुपये १६.७६ कोटीची बहुतांश कामे पूर्ण करून दिनांक २०/१०/२०२३ पासून पुलावरून वाहतूक सुरु करण्यात आली आहे.
दुरुस्तीचे काम प्रगतीत असताना स्थानिकांची गैरसोय होवू नये याकरीता सा.बां.विभागामार्फत विनाशुल्क फेरी बोट सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.
(२) व (३) सदर पुलाच्या दोन्ही बाजूस वाळू उत्खनन केल्यास, पुलाच्या पायास क्षती होण्याची शक्यता विचारात घेता, पुलापासून ५०० मी अंतरापर्यंत वाळू उत्खनन न करणेबाबत संबंधित विभागास अवगत करण्यात आले आहे.
सदर पुलाच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम ९०% पूर्ण झाले असून दिनांक २०/१०/२०२३ पासून सदर पुलावरुन २० मे.टन (वाहन व मालासह) वजनापर्यंतची वाहतूक २० किमी/तास या वेग मर्यादेत सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत शाळा/महाविद्यालयांलगतच्या परिसरात गुटखा विक्री सुरू असल्याबाबत

**(२९) * २११२७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९८८३ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास मनाई असतानाही अनेक शाळांजवळील टपऱ्यांवर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील अनेक शाळांच्या प्रवेशद्वारासमोरील टपऱ्यांवर तंबाखूजन्य पदार्थांसह बंदी असलेल्या गुटख्याचीही विक्री सुरू असल्याने शाळकरी मुले तंबाखूजन्य, तसेच गुटख्याच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या १२ यंत्रणांना तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात कारवाई करण्याचे अधिकार असतानाही बहुतांश सर्वच यंत्रणांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने या पदार्थांची शाळांच्या परिसरात सर्रास विक्री होताना दिसून येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मुंबईतील शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांसह गुटख्याची नियमबाह्यरित्या विक्री करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) शाळकरी मुलांना व्यसनाधीन होण्यापासून रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत दिनांक १० फेब्रुवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व शैक्षणिक संस्थामध्ये तंबाखूमुक्त शाळा धोरण, २०२० राबविण्यात येत आहे.

तसेच, अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास २० जुलै २०१२ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे. त्यानुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या अधिसूचनेअन्वये राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक साठी प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने ०१ एप्रिल २०२३ ते २४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत एकूण ६७६ ठिकाणी कारवाई करून ४७० गुन्हे पोलिसात नोंदविण्यात आले असून ९५ वाहने जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच ४१३ आस्थापना सील करण्यात आलेल्या आहेत. याप्रकारे एकूण रुपये १७ कोटी ६४ लाख ७६ हजार ६७४ किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आलेला आहे व ७०९ आरोपीना पोलीसांमार्फत अटक करण्यात आलेली आहे.

तसेच, The Cigarettes and Other Tobacco Products Act, २००३ (COTPA) मधील कलम ४ अंतर्गत ०१ एप्रिल २०२३ ते १५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत २१३ प्रकरणी कारवाई करून रुपये ४४९९९/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, कलम ६ अन्वये एकूण ९ प्रकरणी कारवाई करून १८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, कलम ७ अन्वये एका प्रकरणी रुपये २३१० किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केट मधून भेसळयुक्त तेल जप्त केल्याबाबत

**(३०) * २१४८० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एपीएमसी मार्केट, नवी मुंबई येथील एका तेलाच्या गोडाऊनवर छापा मारुन नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त तेल जप्त केल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गोडाऊनमध्ये पामतेलामध्ये इसेन्स टाकून तेल तयार केल्याचे तसेच हे भेसळयुक्त तेल बाजारात विकले जात असल्याचेही तपासाअंती निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने तेलात भेसळ करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मे. गौतम अग्रो इंडिया, नवी मुंबई या अन्न आस्थापनेवर माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये पोलीस आयुक्त, नवी मुंबई, गुन्हे शाखा, युनिट-१ तसेच भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, पश्चिम क्षेत्र, मुंबई यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी यांनी सदर आस्थापनेची तपासणी करून खाद्यतेलाचे एकूण १३ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. सदर नमुन्यापैकी ९ नमुने कमी दर्जाचे आढळून आले असून उर्वरित ४ अन्न नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सदर अन्न आस्थापनेचा परवाना केंद्रीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांचेकडून निलंबित करण्यात आला आहे.

सदर आस्थापनेच्या अन्न व्यावसायिकाने सर्व कमी दर्जाचे अन्न नमुने प्रकरणी विश्लेषकाच्या अहवालाविरुध्द सदर अन्न नमुने रेफरल प्रयोगशाळेत पाठविण्याकरीता अपील केले आहे. त्यानुसार सदर अन्न नमुने रेफरल प्रयोगशाळेत फेर विश्लेषणाकरीता पाठविण्यात आले आहेत. अन्न नमुन्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त होताच नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी (माध्यमिक) चंद्रपूर यांच्या कामकाजातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(३१) * २२१६२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), चंद्रपूर यांच्या कार्यालयात शेकडो शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या पथकाने ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयाची तपासणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयात तपासणीच्या वेळी कुठल्याही कार्यासनाकडे कार्यविवरण नोंदवही नसल्याचे निदर्शनास आले असून, शाळेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी विहीत मुदतीत कार्यवाही केली नसल्याने कार्यालयात अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कार्यालयाची तपासणी पथकाने तपासणी केली असता अनेक प्रकरणात अनियमितता, नियमांचे पालन न करणे तसेच सेवानिवृत्त/कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रकरणे निकाली काढण्यात विलंब करणाऱ्या चंद्रपूर शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तपासणी पथकाच्या अहवालाच्या अनुषंगाने त्रुटीपुर्तता अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.चंद्रपुर यांनी शिक्षण उपसंचालक, नागपुर यांना दिनांक ६/११/२०२३ च्या पत्रान्वये पाठविला असून सदर अहवालाची छानणी शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावर सुरु आहे. सदर

कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबंधिताविरुध्द प्रचलित नियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे समर्थनगर (ता.जि.सातारा) या ग्रामपंचायत हद्दीतील पुलाची व रस्त्याची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३२) * २११६० श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, सातारा, रहिमतपूर, पुसेसावळी, विटा रोड राज्यमार्ग १४० या रस्त्यांचे मौजे समर्थनगर ता.जि.सातारा या ग्रामपंचायत हद्दीमधील प्रसाद चौक येथे रस्त्यांचे काम संबंधित ठेकेदाराने अपूर्ण ठेवले असून बऱ्याच ठिकाणी रस्ता व पुलांची कामे विशेषत: गोडोली व धामणेर या भागामधील पुलाची व रस्त्यांची कामे अपूर्ण ठेवलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे अपूर्ण ठेवलेली असल्यामुळे तेथील नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असून, गेल्या सहा महिन्यांत ७ नागरिकांचा मृत्यू झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अपूर्ण असलेली रस्त्यांची व पुलांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत सद्य:स्थितीत प्रगतीत आहे.
(२) समर्थ नगर येथील प्रसाद चौक या ठिकाणी मागील सहा महिन्यात अपूर्ण कामामुळे अपघात झाल्याची नोंद नाही.
(३) व (४) सदर काम भौतिकदृष्टया ९२% पूर्ण झाले असून उर्वरित कामे जानेवारी, २०२४ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील ग्रंथालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) * २२७०४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: नांदेड जिल्ह्यात ७५८ शासकीय अनुदानित ग्रंथालये असून त्यापैकी ३८ ग्रंथालये बंद झाली असून उर्वरित ग्रंथालयांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून ग्रंथालयांच्या इमारतींचीही दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व जिल्हापातळीवरील शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यांमध्येच शिक्षणासाठी चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाकडून सार्वजनिक ग्रंथालयांना

देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये ६० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील ग्रंथालयाच्या इमातीची दुरवस्था झाली असून काही ठिकाणी छत कोसळले असल्याने तेथे येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय अनुदान घेणाऱ्या ग्रंथालयामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दुष्टीने तसेच दुरवस्था झालेल्या ग्रंथालयांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नांदेड जिल्ह्यातील ७५८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांपैकी अकार्यक्षम ३८ ग्रंथालयांची मान्यता २०२२-२०२३ पासून नियमानुसार रद्द करण्यात आली आहे. तसेच उर्वरीत ७२० ग्रंथालय हे त्या त्या दर्जा/वर्गा प्रमाणे स्थानिक वाचक/विद्यार्थी यांना ग्रंथालयाच्या स्वत:च्या इमारतीत/ भाड्याच्या इमारतीत ग्रंथालयीन सोयी-सुविधा उपलब्ध करुन देत आहेत.
(२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक २१/१२/२०२२ अन्वये राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात ६०% वाढ करण्यात आली आहे. सन २०२२-२३ पासून वाढीव दराने अनुदान देण्यात येत आहे.
(३) व (४) जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड या कार्यालयाची जागा नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या मालकीची असून त्याठिकाणी इतर शासकीय कार्यालये व महापालिकेची अभ्यासिका आहे. सदर इमारतीच्या मध्यभागी असलेल्या डोम मधून पावसाच्या पाण्याची गळती होत असल्याने इमारत दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्या कामाची वर्क ऑर्डर देण्याची कार्यवाही महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामातून कार्यमुक्त करणेबाबत

**(३४) * २११९७ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांना शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासोबतच अशैक्षणिक काम करावी लागत असून केंद्र सरकारच्या सन २०२२-२७ या पाच वर्षांसाठी नवभारत साक्षरता अभियानांतर्गत गावनिहाय निरक्षरांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याच्या कामाची जबाबदारी शिक्षण संचालनालयाने दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या आदेशान्वये शिक्षकांवर सोपविली असून, निवडणुकीचीही कामे सोपविण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांना शैक्षणिक काम सोडून अशैक्षणिक कामे दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होत असल्याने, शिक्षकांवर शैक्षणिक कामांखेरीज अन्य अशैक्षणिक कामांची जबाबदारी सोपविण्यात येऊ नये अशी शिक्षकांनी मागणी केल्यानुसार मा.न्यायालयाने शासनास तसे आदेशित केले केले आहे, तसेच याकरीता शिक्षक संघटनांनी मात्र हे सर्वेक्षण स्वयंसेवी संस्थेमार्फत करून घेण्यात यावे, अशी भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागाने हे सर्वेक्षण शिक्षकांकडून करुन घेण्याबाबत ठाम असल्याने शिक्षण विभाग आणि शिक्षक यांच्यात विसंवाद निर्माण झाला असून शिक्षकांनी सर्वेक्षणावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांची जबाबदारी सोपविण्याबाबत शासनाने समिती नेमण्यात आल्याचे व सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मुंबईतील शिक्षक पुरस्काराच्या एका शासकीय कार्यक्रमात दिनांक ५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर समितीची कार्यकक्षा / समितीमध्ये कोणाचा समावेश आहे तसेच समितीने किती कालावधीत अहवाल सादर केला आहे, तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत व समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) शिक्षकांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक व अशैक्षणिक कामांच्या अनुषंगाने सर्वकष अभ्यास करुन उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, दिनांक ०६/०९/२०२३ अन्वये प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे सदर समितीकडून शिफारशीसह प्राप्त अहवाल विचारात घेऊन, याबाबत यथोचित निर्णय घेण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवभोजन केंद्र चालकांचे अनुदान वेळेत अदा केले जात नसल्याबाबत

**(३५) * २२२२६ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १९६०० ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरीब व गरजू लोकांची उदरभरण करणाऱ्या शिवभोजन योजनेच्या केंद्र चालकांची देयके वेळेवर मिळत नसल्याचे दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे दोन लाख शिवभोजन थाळया दररोज उपलब्ध करून दिल्या जातात व १००० पेक्षा जास्त शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत, शिवभोजन केंद्र चालकांचे अनुदान वेळेत अदा करणेबाबत स्थानिक

लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिवभोजन केंद्र चालकांची देयके प्रत्येक महिन्यात देण्यासाठी मानक प्रणाली निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी शिवभोजन योजना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय, दिनांक ०१ जानेवारी, २०२० अन्वये दिनांक २६/०१/२०२० पासून सुरु करण्यात आली असून सद्य:स्थितीत राज्यात १७८३ शिवभोजन केंद्रे कार्यान्वित आहेत.

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात रुपये २२० कोटी मंजूर आहेत. सदर मंजूर तरतुदीतून वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेले अनुदान राज्यातील केंद्र चालकांची प्रलंबित देयके वेळेत प्रदान होण्याच्या दृष्टीने अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयामार्फत एकूण रक्कम रुपये १४३ कोटी वेळोवेळी सर्व जिल्हा पुरवठा कार्यालये/ अन्नधान्य वितरण कार्यालये/शिधावाटप परिमंडळ कार्यालये यांना वितरीत करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शिवभोजन केंद्र चालकांची देयके प्रत्येक महिन्यात वेळेवर देण्यासाठी मानक प्रणाली निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथे बनावट रेशनकार्ड बनवून दिले जात असल्याबाबत

**(३६) * २१६६२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे आठ हजारांमध्ये बनावट रेशनकार्ड बनवून दिले जात असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बनावट रेशनकार्ड बनवून देणाऱ्या व शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.
(२) शिधावाटप कार्यालय क्र.३७/फ, भिवंडी जि.ठाणे या कार्यालयात आठ हजार रुपयामध्ये बनावट शिधापत्रिका बनवुन दिल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी निजामपुरा पोलीस ठाणे, भिवंडी येथे

दिनांक २३/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद झाला आहे. सदर गुन्ह्यातील चार आरोपींना अटक केल्यानंतर पोलीस कस्टडी घेवुन चौकशी करण्यात आली असून प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

सदर प्रकरणात शिधावाटप कार्यालय क्र.३७/फ, भिवंडी जि.ठाणे या कार्यालयातील लिपिकचा सहभाग दिसून आला असून त्यास दिनांक २५/०९/२०२३ पासून निलंबित करण्यात आले असून त्याचेविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या आदेश दिनांक २७/०९/२०२३ अन्वये तपासणी पथक गठीत करुन शिधावाटप कार्यालय क्रमांक ३७/फ, भिवंडी या कार्यालयाच्या शिधापत्रिका विभागाची तपासणी करुन अंतिम अहवाल सादर करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा, महाविद्यालये व तुकड्यांना अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत

**(३७)** * **२१८८७ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना २ फेब्रुवारी, २०२२ रोजी शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून अनुदानासाठी पात्र-अपात्र यादी जाहीर असून त्यातील अपात्र शाळा/ महाविद्यालये व तुकड्यांना त्रुटी पूर्तता करण्यासाठी शासनाने ठराविक मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदतीत त्रुटींची पूर्तता केली असतानाही सदरील अनुदानाच्या यादीतून त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा, महाविद्यालयांना अनुदानापासून वंचित ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा/महाविद्यालये व तुकड्यांना २०% अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, शासन निर्णय, दिनांक ६/२/२०२३ अन्वये, मुल्यांकनानंतर अनुदानासाठी पात्र ठरलेल्या व शासन स्तरावर अघोषित असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/ तुकड्या व अतिरिक्त शाखा व त्यावरील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी यांना विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासन पत्र, दिनांक २०/१२/२०२२ अन्वये, त्रुटीत असलेल्या घोषित व अघोषित शाळांना त्रुटी पुर्तता करण्यास एक महिन्याची मुदत देण्यात येऊन, त्रुटी पूर्ण केलेल्या शाळाचे एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत, सदरहू प्रस्तावांची संचालनालय स्तरावर तपासणी सुरु असून, तपासणी अंती मान्यतेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूण येथे उड्डाण पुल कोसळून झालेल्या दुर्घटनेची चौकशी करण्याबाबत

**(३८) * २२३५२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे, श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूण शहरातील बहादूर शेख नाका येथे १४० कोटी रुपये खर्च करुन उड्डाण पुलाचे बांधकाम सुरु असून सदर पुलाचे काम सुरु असताना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी पुलाचा काही भाग कोसळून दुर्घटना झाल्याने, मुंबई - गोवा रस्त्याच्या बांधकामाच्या सुरक्षेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सदर पुलाची पाहणी करुन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या श्री.गुप्ता, श्री.सिन्हा व श्री.मिश्रा या तज्ज्ञ अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली असून सदर समितीचा तपासणी अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर समितीकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने सदर पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर महामार्ग हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अखत्यारित येतो.

उड्डाणपुलाचे काम सुरु असताना काही भाग कोसळल्याची घटना घडली, हे अंशत: खरे आहे.

सदर पुलाच्या गर्डरला तडा गेल्याने दुर्घटना झाली आहे. सदरचा अपघात उड्डाणपुलाच्या गर्डर पुरता मर्यादित असल्याने मुंबई-गोवा रस्त्याच्या बांधकामाच्या सुरक्षे संदर्भात प्रश्न निर्माण झाले असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.
(२), (३) व (४) या प्रकरणी केंद्र शासनाकडून तज्ञ अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आलेली असून त्यांनी पुलाची पहाणी केलेली आहे व याबाबत अहवाल तयार करण्याचे काम समितीमार्फत प्रगतीत आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्रात सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३९) * २२१२३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाचे ठाणे उपकेंद्र सुरू होऊन नऊ वर्षे झाली तरी या उपकेंद्रात विजेचा अपुरा पुरवठा, ठिकठिकाणी साचलेला कचरा, पाणी टंचाई तसेच इमारतीचीही दुरवस्था झाली असून यासह अन्य सुविधांचा अद्यापही अभाव असल्याचे माहे, ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्यांमुळे हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असून सदर उपकेंद्रात पाणीटंचाईही आहे, तसेच बस सेवेअभावी विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असूनही शिक्षकांचीही नेहमी अनुपस्थिती जाणवत असल्याने या केंद्राच्या कारभाराबाबत अनेक तक्रारी केल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील उपक्रेंद्राला सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर उपकेंद्रात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून एच.टी (११ KV) विद्युत जोडणी करण्यात आली असून, ती इमारतीतील विद्युत मागणी व भविष्यकालीन वाढीव विद्युत मागणीसाठी पुरेशी आहे. कचऱ्याच्या बाबतीत स्थानिक रहिवाशांकडून टाकलेल्या कचऱ्यामुळे अंशत: समस्या उद्भवते. तथापि, सदर कचऱ्याची वेळोवेळी विल्हेवाट लावण्यात येते. महानगरपालिकेमार्फत एक इंच व्यासाची नियमित नळजोडणी करण्यात आली असून, पुरेसा पाणीपुरवठी इमारतीत होत असतो. महानगरपालिकेकडून पाण्याची गुणवत्ता तपासणी सुद्धा करुन घेण्यात येते.

(२) येथे वसतिगृह नसुन, कोणीही विद्यार्थी राहत नाही. ठाणे महानगरपालिका परिवहन विभागामार्फत या उपकेंद्रात पोहचण्यासाठी एकूण ३८ बसफेऱ्या चालविण्यात येत असून, अधिकच्या बसफेऱ्या चालविण्यासाठी महानगरपालिका परिवहन विभागाकडे विद्यापीठाकडून पाठपुरावा सुरु आहे. तसेच उपकेंद्रातील शिक्षक नियमीत उपस्थित असतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात विशेषत: नागपूर व अमरावती जिल्ह्यात संत्रा प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत

**(४०) * २१७११ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २०५७३ ला दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, काटोल, कळमेश्वर (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती) येथे शेतीच्या शाश्वत विकासासाठी, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने फळ पिकांच्या उत्पादनापासून ते मुल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया, एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार करून आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरीता २० कोटी रूपये उपलब्ध करून देण्याची घोषणा मा.वित्त मंत्री यांनी दिनांक ९ मार्च २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात सुमारे ७८ हजार हेक्टरवर संत्र्यांचे ५ ते ६ लाख टन उत्पादन होत असून विदर्भात उत्पादित होणाऱ्या संत्रा फळाची साल ही पातळ असल्याने तसेच टिकवण व साठवण क्षमता सात ते आठ दिवस इतकी कमी असल्याने निर्यातीवर मर्यादा येत असून संत्रा फळावर मुल्यवर्धन प्रक्रिया केल्यास त्याची टिकवण व साठवण क्षमता ही ३ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीकरीता वाढू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत विदर्भात संत्रा फळावरील मुल्यवर्धन प्रक्रिया केंद्रांच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना अत्यंत कमी दरात मालाची विक्री करावी लागत असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने विदर्भात संत्रा प्रक्रिया केंद्रे सुरू करण्याची मागणी स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात "नागपूर, काटोल व कळमेश्वर जि.नागपूर, मोर्शी, जि.अमरावती तथा बुलढाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येतील. यासाठी २० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल" अशी घोषणा केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

कृषी विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, सन २०२२-२३ मध्ये अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये संत्रा पीक लागवडीखाली ७०,८३६ हेक्टर जमीन असून संत्र्यांचे ५,९५,२२२ मे.टन उत्पादन झालेले आहे.

संत्र्यांला वॅक्सिंग केल्यामुळे संत्रा टिकविण्याची क्षमता तीन आठवड्यापेक्षा वाढू शकते. सदर वॅक्सिंगची सुविधा पणन मंडळाच्या अमरावती जिल्ह्यातील वरुड व कारंजा घाडगे येथील सुविधा केंद्रावर उपलब्ध आहे.
(३) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून देशांतर्गत व परदेशांतर्गत संत्रा निर्यात करण्यासाठी अमरावती जिल्ह्यात वरुड येथे "संत्रा निर्यात सुविधा केंद्र" व चांदूर रेल्वे येथे "फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र" उभारण्यात आले आहेत. वरुड येथील संत्रा निर्यात सुविधा केंद्रामध्ये प्रि-कुलिंग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाउॅस व ग्रेडींग लाईन इ. सुविधा उपलब्ध असून, सदर केंद्रावरुन स्थानिक विक्रीकरीता आजतागायत ९६८ मे.टन संत्रा प्रक्रिया करण्यात आलेला आहे.

तसेच, संत्र्यांस सन २०२२ मध्ये सरासरी रुपये ४४७६.१७/- प्रति क्विंटल तर सन २०२३ मध्ये सरासरी रुपये ४६४४.९२/-प्रति क्विंटल इतका दर प्राप्त झालेला आहे.

तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषी मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वरुड मोर्शी येथील संत्रा प्रक्रिया प्रकल्पास मंजुरी प्रदान करणे या विषयाबाबत निवेदन दिलेले आहे.

(४) मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने नागपूर, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात प्राथमिक प्रक्रिया केंद्र (८ केंद्र), दुय्यम प्रक्रिया केंद्र (१६ केंद्र) व उपपदार्थावरील प्रक्रिया प्रकल्प (५ केंद्र) असे एकूण २९ आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणेबाबतच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाच्या दिनांक ०८/११/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या 'परीक्षा व मुल्यमापन' मंडळावर पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती करण्याबाबत

**(४१) * २१०७८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या 'परीक्षा व मुल्यमापन' मंडळाच्या संचालकपदी पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती न करता सद्य:स्थितीत प्रभारी संचालकांकडून विभागाचा कारभार सुरू असल्याची बाब दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णवेळ संचालक नसल्यामुळे विद्यापीठात गेल्या काही महिन्यांपासून निकालांच्या वेळेत अनियमितता दिसून येत असून, मुख्य परिक्षेच्या निकालास उशीर होत असून फेरपरीक्षा तोंडावर आली, तरी मुख्य परिक्षेच्या पुनर्मुल्यांकनाचा निकालच लागत नसल्यामुळे फेरपरीक्षा द्यायची की नाही असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंडळाच्या संचालक पदावर पूर्णवेळ संचालकांची नियुक्ती करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने काही महिन्यांपुर्वी जाहिरात काढली होती आणि त्यासाठी आठ इच्छुक उमेदवारांनी अर्ज केले होते, तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी संचालक पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या असूनही अद्यापपर्यंत कोणाच्याही नावाची घोषणा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या संचालक पदासाठी नेमण्यात आलेल्या निवड समितीने यांपैकी कोणत्याही उमेदवाराच्या नावाची शिफारस न केल्याने आता पुनश्च: नव्याने सदरहू पदाच्या भरतीसाठी मुंबई विद्यापीठाला जाहिरात काढावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबई विद्यापीठाच्या 'परीक्षा व मुल्यमापन' मंडळाच्या संचालकपदी पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ या पदाकरीता दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाकडून मुलाखती घेण्यात आल्या होत्या. तथापि, सदर पदाकरीता समितीने एकाही उमेदवाराची शिफारस केली नाही. यास्तव सदरचे पद भरण्याकरीता विद्यापीठाकडून दिनांक १२ ऑक्टोबर,२०२३ रोजी नव्याने जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांच्या दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी मुलाखती घेण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भाषा संचालकाचे रिक्त पद भरण्याबाबत

**(४२) * २१३३२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भाषा संचालक पद गत २० वर्षांपासून रिक्त असून अनुभव संपन्न व्यक्ती भाषा संचालक पदावर नसल्याने भाषा संचालनालयाची मूलभूत कामे बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सुकाणू समिती स्थापन केली असून या समितीच्या वतीने अजूनपर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मराठी भाषांतर पूर्ण केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाषा संचालक पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात देऊनही अद्यापही संचालक पद भरण्यात आलेले नाही, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, गत २० वर्षांपासून रिक्त असलेले भाषा संचालकाचे पद भरण्यासाठी तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मराठी भाषांतर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही. भाषा संचालनालय हे मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत कार्यालय आहे. भाषा संचालक पदावर सन-२००२ पासून दिनांक २२/०१/२०११ ते दिनांक ३०/११/२०११ हा काळ वगळता इतर वेळी अतिरिक्त कार्यभार किंवा प्रतिनियुक्तीने सदर पदाचे कामकाज चालवण्यात येत आहे.

भाषा संचालक पदाच्या विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार सदरचे पद भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे विभागाकडून मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आयोगा मार्फत पद भरण्यासाठी दिनांक ०३/०१/२०१४, दिनांक ०५/०८/२०१४ आणि दिनांक २२/०७/२०२२ रोजी जाहिरात देण्यात आली होती. तथापि, सुयोग्य उमेदवार उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सदर पदाचे सेवाप्रवेश नियम

बदलण्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यान अतिरिक्त कार्यभाराने तसेच प्रतिनियुक्तीने संचालक पदाचे कामकाज चालवण्यात येत असल्यामुळे संचालनालयाची मूलभूत कामे बंद झालेली नाहीत.

(२) हे खरे नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अनुवाद भाषा संचालनालयाकडून पूर्ण करण्यात येऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागास दिनांक ११/१०/२०२३ रोजी पाठविण्यात आला आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पद भरण्यासाठी तीन वेळेस (दिनांक ०३/०१/२०१४, दिनांक ०५/०८/२०१४ आणि दिनांक २२/०७/२०२२) जाहिरात देऊनही विद्यमान सेवाप्रवेशनियमानुसार संचालक पदावर सुयोग्य उमेदवार अद्यापही उपलब्ध होऊ शकलेला नाही. त्यामुळे विद्यमान सेवा प्रवेशनियम बदलण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार संचालक पदावर सुयोग्य उमेदवार अद्यापही उपलब्ध होऊ न शकल्याने विद्यमान पदाचे सेवाप्रवेश नियम बदलण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मराठी अनुवाद भाषा संचालनालयामार्फत दिनांक ११/१०/२०२३ रोजी पूर्ण करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळकरी मुलींना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(४३) * २११३५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना १२ जिल्ह्यांमधील किमान १५ शाळांत आकस्मिक पाहणी करून अहवाल देण्याचा आदेश दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांतील दुर्गम व ग्रामीण भागातील काही शाळांची जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने केलेल्या तपासणीत बहुतांश शाळांत वेंडिंग मशीनमध्ये सॅनिटरी पॅड नसल्याचे तसेच त्यांच्या विल्हेवाटीची कोणतीही व्यवस्था नसून, स्वच्छतागृहे अत्यंत अस्वच्छ असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली जिल्ह्यात शाळकरी विद्यार्थीनींना शाळेतील छत नसलेल्या स्वच्छतागृहात जावे लागत असून पावसाळ्यात त्याचा वापर करणेही शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दुर्गम व ग्रामीण भागातील शाळांची झालेली दुरवस्था सुधारण्याकरीता तसेच शाळकरी मुलींना सुयोग्य मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.

(२) मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५/०७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना बारा जिल्ह्यांमधील प्रत्येकी पंधरा शाळांमध्ये अचानक भेटी देवून शाळांतील स्वच्छतागृह व सॅनिटरी पॅड वितरण व विल्हेवाट या विषयी अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले होते. त्याबाबतचा अहवाल विधी सेवा प्राधिकरणाने मा.न्यायालयास सादर केला आहे. मा.न्यायालयाने ज्या शाळांमध्ये स्वच्छतागृहे व सॅनिटरी पॅड उपलब्धता याबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे त्या शाळांना पुन्हा भेटी देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक ११/१०/२०२३ रोजी दिले आहेत. याबबत न्यायप्रविष्ट जनहीत याचिकेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ मध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ९९४० शाळांना सॅनिटरी पॅड सह वेंडींग मशीन व इनसिनरेटर उपलब्ध करून देण्यात आले असून सन २०२३-२४ मध्ये ८२०३ शाळांना सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

याव्यतिरिक्त समग्र अभियानांतर्गत संयुक्त शाळा अनुदानाच्या रकमेतून सॅनिटरी पॅड खरेदीसाठी शाळांना निधी प्रदान करण्यात येतो. तसेच, अस्मिता योजनेतंर्गत देखील सॅनिटरी पॅड शाळांना उपलब्ध करून देण्यात येतात.

आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, व समग्र शिक्षा अभियान इत्यादींमधुन स्वच्छतागृहांचे बांधकाम व स्वच्छता यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक शुल्कामध्ये दुप्पट वाढ केल्याबाबत

**(४४)** * **२१४६६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजातील विविध घटकांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची दिनांक १ जुलै, १९८९ रोजी स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक शुल्कामध्ये पूर्वतयारी अभ्यासक्रमांसाठी ३०० रुपये आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमांसाठी ५,५०० रुपये वार्षिक वाढ करण्यात आली असल्यामुळे सामान्य विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शुल्क वाढीबाबत फेरविचार करुन, शुल्क वाढ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत चालविला जाणारा पूर्वतयारी अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बंद करण्यात आलेला असल्याने सदर अभ्यासक्रमासाठी रुपये ३०० फी वाढीचा निर्णय विद्यापीठामार्फत घेण्यात आलेला नाही.

व्यावसायिक अभ्यासक्रमांची वार्षिक शुल्क वाढ ही खालील मुद्यांच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

१.सदर विद्यापीठ स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ असून विद्यापीठास आवर्ती खर्च व वेतनासाठी शासन अनुदान मिळत नाही.

२. विद्यापीठाचा आवर्ती खर्च हा उत्पन्नापेक्षा जास्त झाल्याने तूट भरुन काढण्यासाठी अभ्यासक्रमाचे शुल्क वाढ करणे विद्यापीठासाठी अनिवार्य झाले.

३. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क मागील १५ वर्षांपासून वाढविण्यात आलेले नव्हते.

४. मा.राज्यपाल कार्यालयाकडून राबविण्यात येणार क्रीडा महोत्सव, इंद्रधनुष्य युवक महोत्सव, आव्हान, अविष्कार, आपत्ती व्यवस्थापन शुल्क, एन.एस.एस.शुल्क, परीक्षा शुल्क इ. संवैधानिक कार्यक्रमांचे शुल्क विद्यापीठाकडून विविध अभ्यासक्रमाच्या शुल्क रचनेत घेतले जात नव्हते. आता, सदर संवैधानिक कार्यक्रमांच्या शुल्काचा समावेश शैक्षणिक शुल्कात करण्यात आला आहे.

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सेमिस्टर सिस्टीम नुसार चालू शैक्षणिक वर्षापासून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात येणार असल्याने परीक्षा शुल्कात वाढ झालेली आहे.

६. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या अध्ययन साहित्याची छपाई खर्च हा पंधरा वर्षापूर्वी निश्चित झाला होता.त्या खर्चात आता तीन पटीने वाढ झाली असल्याने शुल्क वाढविणे विद्यापीठाला अनिवार्य झाले.

शुल्क वाढीचा निर्णय घेण्यात आला असला तरी, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांना एकूण ४,६६,१११ विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क भरुन प्रवेश घेतलेले आहेत. विद्यापीठाच्या अनेक शिक्षणक्रमांना अनेक संस्थाकडून तसेच विद्यार्थ्यांकडून मागणी येत आहे, त्यावरुन शुल्कवाढीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

**(४५) * २१८८९ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना तुकड्यांचे अनुदान देण्यासाठी शासनाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी आदेश पारित केला असून, वाणिज्य या शाखेचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून दिले जात असल्याने अनेक वाणिज्य शाखेच्या तुकड्या अनुदानापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनुदानासाठी पारित केलेल्या आदेशामध्ये इंग्रजी माध्यम वगळून कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याचे आदेशात म्हटले आहे परंतु वाणिज्य ही शाखा इंग्रजी भाषेमधून शिकविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांनी सदर शाखांचे मुल्यांकन करताना वाणिज्य शाखा इंग्रजी माध्यम असा अर्थ लावून अशा कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानापासून वंचित ठेवले असून असे अनेक प्रस्ताव शिक्षण संचालक कार्यालयाकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदरचे कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक अनुदानित शाळांना जोडून असल्यामुळे त्यांना अनुदान देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

शासकीय अनुदानाकरीता वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या शाळा पात्रतेच्या निकषामध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून अन्य शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी ज्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये पात्रतेचे निकष पूर्ण करतात अशा शाळांना अनुज्ञेय करण्यात येते.
(३) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत, राज्यातील एकूण ३१ मूळ वाणिज्य शाखा/ अतिरिक्त शाखा/ तुकड्यांचे माध्यम इंग्रजी असल्याने शासनाने विहीत केलेल्या निकषानुसार छाननी अंती सदर मूळ शाखा/ तुकड्या अनुदानासाठी अपात्र करण्यात आल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.